श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती सेवामंडळ
श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिर, पुणे

## श्रीसद्‌गुरू वासुदेवानंतसरस्वती तथा श्री बाबामहाराज सहस्रबुद्धे

# जयंती उत्सव

| डिसेंबर २०२३ | जयंती उत्सव विशेषांक | खासगी वितरणासाठी | पाने १२ |

## सद्गुरू श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे यांचा १४०वा जयंती उत्सव



*।। श्रीसद्गुरु वासुदेवानंतसरस्वत्यै नमः ।।*

पुणे येथे श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती तथा श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे यांचा १४०वा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. दि. २२ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते आणि त्याला भक्तगणांचा प्रतिसाद अत्यंत उत्साहपूर्ण होता. दि. २२ ते २५ नोव्हेंबरपर्यंत सकाळी १०.०० ते १२.१५ या काळात ह.भ.प. पुरुषोत्तम थेटे, ह.भ.प. गौरी घाटणेकर, ह.भ.प. महेश कुलकर्णी, ह.भ.प. नंदिनी वर्तक यांची कीर्तने झाली. दि. २२ ते २४ नोव्हेंबर, सायंकाळी श्री. दिलीपराव महाजन यांचे 'श्रीहनुमान कथा' या विषयावर आणि दि. २५ नोव्हेंबर रोजी आचार्य पद्मनाभ व्यास यांचे 'श्रीसद्गुरू बाबामहाराजांची आरती' या विषयावर प्रवचन आयोजित करण्यात आले होते.

**रविवार, दि. २६ नोव्हेंबर २०२३; कार्तिक शु।। १४, शक १९४५** रोजी सकाळी ध्वजपूजनाने उत्सवाच्या मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. सामुदायिक नामस्मरण, सामुदायिक उपासना, उपनिषद पठण, लघुरुद्राभिषेक, आचार्य पद्मनाभ व्यास यांचे प्रवचन, दुपारी ह.भ.प. दर्शनराव वझे यांचे कीर्तन, महाप्रसाद आदी कार्यक्रमानंतर सायंकाळी पाठांतर स्पर्धा पारितोषिक आणि पाठशाळेच्या परीक्षांचे प्रमाणपत्र वितरण; तसेच विद्वज्जनांचा सत्कार यासाठी एका समारंभाचे आयोजन केलेले होते.

**पारितोषिक आणि प्रमाणपत्र वितरण तसेच विद्वज्जनांचा सत्कार समारंभ**

रविवार, दि. २६ नोव्हेंबर २०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजता विद्वत् सत्कार आणि पाठांतर स्पर्धा आणि वेदपाठशाळा परीक्षांचे निकाल आणि पारितोषिक वितरण समारंभ प्रतिवर्षाप्रमाणेच



*डावीकडून : घनपाठी वे.मू. मनोज जोगळेकर, पंडितप्रवर हरेराम त्रिपाठी जी, श्री. विकासराव वालावलकर, पंडितप्रवर  मधुसूदन शर्मा*

आयोजित करण्यात आला होता. या समारंभाचे अध्यक्ष म्हणून पंडितप्रवर हरेराम त्रिपाठी जी, कुलगुरू - कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर यांना निमंत्रित करण्यात आले होते.

समारंभाच्या प्रारंभी वे.मू. प्रथमेश पुरोहित आणि वे.मू. पुरुषोत्तम वझे यांनी ईशस्तवन केले. सूत्रसंचालक वे.मू. प्रसाद निगुडकर यांनी समारंभाचे नियोजित अध्यक्ष पंडितप्रवर हरेराम त्रिपाठी जी यांना अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती करून त्यांच्या अनुमतीने प्रास्ताविक केले. ते म्हणाले, ''प्रतिवर्षी श्रीबाबामहाराजांच्या जयंती उत्सवाच्यानिमित्ताने वैदिक परीक्षा, पाठांतर स्पर्धा तसेच विद्वज्जनांचा सत्कार आयोजित केला जातो. आपल्या सद्गुरूंच्या आदेशानुसार श्रीसहजानंदसरस्वती स्वामीमहाराज यांनी वैदिक धर्माच्या संरक्षणासाठी आणि प्रसारासाठी येथे पाठशाळा सुरू केलेली आहे आणि गेली साठ वर्षे ही पाठांतर स्पर्धा सातत्याने सुरू आहे. दिवसेंदिवस त्यात सहभागी होणाऱ्यांची संख्या वाढत आहे आणि श्रीकाकामहाराज ही परंपरा अधिक विकसित करीत आहेत.

या वर्षी महाराष्ट्र, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, कर्नाटक, आसाम, तामिळनाडू , गोवा, आंध्र प्रदेश आणि आसाम अशा विविध राज्यातील पंचेचाळीस पाठशाळातील दोनशे चाळीस विद्यार्थी या परीक्षांना बसले. ऋग्वेद, शुक्ल यजुर्वेद, कृष्ण यजुर्वेद, काण्व यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, यज्ञीय कर्मकांड आदी विषयांच्या परीक्षा घेण्यात आल्या. शृंगेरी पीठ, कांची कामकोटी पीठ, म्हैसूर दत्त पीठ अशा धर्मपीठांकडून मिळणाऱ्या प्रमाणपत्राइतकेच श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती पाठशाळेने दिलेले प्रमाणपत्र भारतभर प्रतिष्ठेचे मानले जाते असे अनेक सहभागी विद्यार्थ्यांनी सांगितले. याशिवाय श्रीमहाराजांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी पाठांतर स्पर्धा सुरू केलेली आहे, त्यात या वर्षी पुणे-मुंबईच्या वीस मुलांनी भाग घेतला. श्रीमहाराजांनी सुरू केलेल्या पाठशाळेतून आजवर आठ घनपाठी, क्रमपाठी, पदपाठी आणि शाखाध्यायी तयार झाले. या वर्षी ज्यांचा आपण आता सत्कार करणार आहोत ते घनपाठी याच पाठशाळेचे विद्यार्थी आहेत. त्यांनी काही दिवसांपूर्वी याच मंदिरात मुखोद्गत घनपारायण यशस्विरीत्या पूर्ण केले. मंदिरातर्फे प्रतिवर्षी पाठशाळांना भरघोस आर्थिक साहाय्यही केले जात आहे.''

सूत्रसंचालकांनी अध्यक्षांचा परिचय करून देताना सांगितले ''पंडितप्रवर श्री हरेराम त्रिपाठी जी हे कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूरचे कुलगुरू आहेत. तसेच माजी कुलगुरू, संपूर्णानंद संस्कृत विद्यापीठ वाराणसी, प्राध्यापक, श्री



सूत्रसंचालक वे.मू. प्रसाद निगुडकर



वे.मू. प्रथमेश पुरोहित आणि वे.मू. पुरुषोत्तम वझे

लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ नवी दिल्ली, संस्थापक आणि संचालक, आय.के.एस. उच्च शिक्षण केंद्र, उत्तर प्रदेश सरकार अशी अनेक महत्त्वाची पदे त्यांनी भूषविलेली आहेत.

श्री. त्रिपाठी जींचे शिक्षण – एम.ए. (तत्त्वज्ञान) आचार्य – न्याय, सांख्ययोग आणि शंकरवेदांत, जे.आर.एफ. (तत्त्वज्ञान) यासह विद्यावाचस्पती या पदवीने ते सन्मानित आहेत. अध्यापनाचा ३० वर्षाचा अनुभव, प्रशासकीय २६ वर्षांचा अनुभव, नवन्याय तत्त्वज्ञान, सांख्ययोग, शंकर वेदांत, भारतीय तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र आणि भारतीय ज्ञान प्रणाली यामध्ये विशेषज्ञ.

त्यांना मिळालेले पुरस्कार व सन्मान – (१) शंकर पुरस्कार, उत्तर प्रदेश संस्कृत संस्थान, लखनऊ (२) महर्षी बादरायण व्यास सन्मान राष्ट्रपती पुरस्कार (३) पाणिनीय पुरस्कार, उत्तर प्रदेश संस्कृत संस्थान (४) संस्कृत सेवा उत्कृष्टता विशेष पुरस्कार, उत्तर प्रदेश (५) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन अलंकरण – रोटरी क्लब, वाराणसी

(६) पूर्वांचल गौरव अवॉर्ड, वाराणसी (७) गंगेशोपाध्याय आंतरराष्ट्रीय सन्मान सीवन – अमेरिका. शिवाय संशोधनासाठी एम.ए. आणि युजीसी/जेआरएफमध्ये आठ सुवर्णपदके

संशोधन प्रकल्प – शब्दमणी मयुख, तत्त्वचिंतामणी दिधिती प्रकाश (दुर्मीळ हस्तलिखिते) भाग १ ते ४, भारतीय दर्शनाचा कर्मिक विकास सिद्धांतिक एवं ऐतिहासिक संदर्भ, मुख्य अन्वेषक आय. के. एस. केंद्र एस. एस. व्ही. व्ही. वाराणसी

ग्रंथसंपदा – तेरा पुस्तके संपादित, एकवीस पुस्तके प्रकाशन प्रक्रियेत आहेत, दहा शोध निबंध, एकोणीस पीएच.डी. व दहा एम.फिल. विद्यार्थ्यांना संशोधन मार्गदर्शन, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय चर्चासत्र व कार्यशाळांमध्ये सक्रिय सहभाग. असे बहुश्रुत व्यक्तिमत्त्व आज आपल्याला अध्यक्ष म्हणून लाभले आहेत.''

संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले आणि त्यानंतर अध्यक्ष महोदयांनी आपले स्थान ग्रहण केले.

वैद्य श्री. ओंकार शहापूरकर यांनी 'पाठांतराचे महत्त्व' या विषयावर पाठांतरस्पर्धेच्या संदर्भात आपले विचार यानंतर व्यक्त केले. ते म्हणाले, ''शालेय जीवन असो की उच्च शिक्षण असो पाठांतर आपली पाठ सोडत नाही आणि पाठांतराची आपण सवय केली की ते पाठांतर आपली पाठराखण करते हे निश्चित. आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये शालेय जीवनाच्या सुरुवातीपासूनच घरात मुलांकडून देवदेवतांच्या अनेक स्तोत्रांचे पाठांतर करवून घेतले जाते. ह्या पाठांतरामुळे नकळतच मेंदूचा प्री फ्रंटल कॉर्टेक्स, म्हणजे साधारणतः आपण गंध लावतो तो भाग, उत्तेजित होत असतो. आणि हा भाग उत्तेजित झाला की नवीन नवीन संकल्पना समजून घेणं विद्यार्थ्यांना सोपं होतं. एकदा नवीन संकल्पना त्यांना चांगल्या समजायला लागल्या की हायर ऑर्डर थिंकिंगचा मार्ग मोकळा होतो आणि त्यातून एक आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांना शाळेमध्ये चांगले गुण मिळतात. म्हणून मुलांनी दररोज काहीतरी थोडंफार पाठांतर करावं. म्हणजे त्यांना अभ्यासातदेखील फायदा होईल. आपल्या मेंदूमध्ये एक शक्ती असते. आपला मेंदू आपल्या जीवनशैलीनुसार नवनवीन कनेक्शन्स तयार करू शकतो किंवा असलेली कनेक्शन्स बदलू शकतो. आजच्या काळात सांगायचं झालं तर इन्फॉर्मेशन सुपर जे इंटरनेटमध्ये असतं अशा प्रकारचं एक नेटवर्क आपल्या मेंदूमध्ये देखील असतं आणि ते मॉडिफाय करणं म्हणजे त्याला वाढवणं त्याची 'बँड विड्थ' वाढवणं, स्पीड वाढवणं ह्या सगळ्या गोष्टी आपला मेंदू करू शकत असतो. याला न्यूरल प्लास्टिसिटी असं संबोधलं जातं वैद्यकीय शास्त्रामध्ये. ही जी न्यूरल प्लास्टिसिटी आहे ही पाठांतरामुळे वाढत असते आणि याचा फायदा म्हणून विद्यार्थ्यांना ग्रास्पिंग चांगलं होतं आणि वार्धक्याच्या काळीदेखील याचा फायदा होतो. आज विश्वामध्ये अनेक कोटी लोकांना अल्झायमर डिसीज किंवा स्मृतिभ्रंश हा रोग आयुष्याच्या सायंकाळी होत असतो आणि त्यावर फारशा काही ट्रीटमेंट्स उपलब्ध नाही. परंतु ही व्याधी आपल्याला होऊ नये असं आपल्याला हवं असेल तर पाठांतर हा त्याच्यावरचा एक उपाय निश्चित होऊ शकतो. दुसरं असं की एकदा न्यूरल प्लास्टिसिटी वाढली की मेंदूच्या अनेक



पंडितप्रवर हरेराम त्रिपाठी जी यांचा
श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते सत्कार



वैद्य श्री. ओंकार शहापूरकर 'पाठांतराचे महत्त्व' याविषयी बोलताना

आजारांचे जे रुग्ण आहेत त्यांनादेखील रिकव्हरीसाठी खूप चांगला फायदा होऊ शकतो. म्हणजे स्ट्रोक असेल किंवा पार्किन्सन असेल अशा रुग्णांचा मेंदूचा जर का काही भाग निकामी झाला असेल तर न्यूरो प्लास्टिसिटी चांगले असलेले लोक त्याच्यातून सहज बाहेर पडू शकतात. किंवा त्यांची रिकव्हरी चांगली होऊ शकते. किंवा काही लोक दररोज काहीतरी पेन किलर घेत असतात. ही पेन किलर जे घेत असतात त्यांचा मेंदूमधला 'पेन पर्सेप्शन पाथवे' खूप स्ट्राँग असतो, म्हणून त्यांना पेन किलर औषधं घ्यायला लागतात. पण जर का न्यूरो प्लास्टिसिटी चांगली असेल किंवा त्या रुग्णांचं पाठांतर चांगलं असेल, तर आपला मेंदू हा 'पेन पर्सेप्शन पाथवे' बदलू शकतो. तेव्हा पेन किलरची आपली आवश्यकता कमी होऊ शकते आणि पर्यायाने पेन किलरमुळे होणारे साईड इफेक्ट्स आहेत त्यापासून देखील आपली काही प्रमाणात सुटका होऊ शकते. व्यवसायाविषयी बोलायचं झालं तर इंजिनीयर असो, वकील असो किंवा डॉक्टर असो ह्या लोकांचं पाठांतराशिवाय पानदेखील हलणं शक्य नाही. कारण ह्या लोकांना खूप वस्तुनिष्ठ गोष्टींची संगती लावून त्यावर क्षणार्धात काही निर्णय घ्यायचे असतात. आणि त्यावरच कधी रुग्णांचं, कधी त्यांच्या अशीलांचं भविष्य अवलंबून असतं. म्हणून ह्या लोकांचा पाठांतराकडे चांगला कल असतो. समर्थ रामदास स्वामींनी पाठांतर कसं करावं याविषयी आपल्याला काही मार्गदर्शन केलेलं आहे ते मी वाचून दाखवतो.

प्रातःकाळी उठत जावे । काही प्रातःस्मरण करावे ।
नित्य नेमे स्मरावे। पाठांतर ।।

म्हणजे सकाळी केलेलं पाठांतर चांगलं असतं असं समर्थ रामदास स्वामींचा आपल्याला उपदेश आहे, त्यावर आपण जरूर विचार करावा. आता ज्या लोकांचं पाठांतर चांगलं असतं अशा लोकांविषयी समर्थ रामदास स्वामींनी असं म्हटलं आहे,

' प्रबंदाची पाठांतरे । उत्तरासी सांगती उत्तरें ।
नेमके बोलतां अंतरे । निववी सकळांची ।।६।।'

म्हणजे काही लोकांना साहित्य प्रबंध तोंडपाठ असतात असे लोक त्यांना विचारलेल्या प्रश्नांची मुद्देसूद आणि समर्पक उत्तरे देऊ शकतात. त्या उत्तरांमुळे अनेक लोकांचं समाधान होतं आणि पर्यायाने अशा व्यक्तीला जनप्रियत्व प्राप्त होतं. हेदेखील पाठांतराचं एक महत्त्व आहे. आपल्या भारतीय संस्कृतीविषयी बोलायचं झालं तर वेदांचे अनन्य साधारण महत्त्व आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये आहे. अनेक परकीय आक्रमणं झाली. आपली विद्यापीठं जाळली गेली. परंतु आपले वेद शाबूत राहिले. अनादि कालापासून आजतागायत हे वेद गुरुशिष्य परंपरेनुसार किंवा पाठांतरामुळे शाबूत राहिले आहेत आणि ते आपल्यापर्यंत पोहोचलेले आहेत आणि यातलं सगळ्यात चांगलं बोलकं उदाहरण आपण सगळ्यांनी जवळून बघितलेलं आहे की महाराजांच्या आपल्या वेद पाठशाळेमध्ये एक वेदमूर्ती श्री. मनोज जोगळेकर यांनी श्री बाबामहाराजांच्या मंदिरामध्ये ऋग्वेदाचे मुखोद्गत घन पारायण करून दाखवलेले आहे. ५३ दिवस सतत हे पारायण चालू होतं म्हणजे केवढं ते पाठांतर असेल विचार करा.

'बहुत करावी पाठांतरे । कंठी करावे ग्रंथातरे ।।'

हा समर्थ रामदास स्वामींचा उपदेश आपल्याला ह्याकरिताच आहे की जास्तीत जास्त कविता आपण सर्वांनी पाठ कराव्यात. अर्थात हे पाठांतर करायचं म्हंटलं तरी ईश्वरी कृपा त्यासाठी आवश्यक आहे. म्हणून 'बहुत पाठांतरे दे रे राम ।' असं समर्थ रामदास स्वामींनी प्रभू रामचंद्राकडे याचना केली आहे. अशीच प्रार्थना आपण आपल्या सद्गुरूंकडे करु या की आपलं पाठांतर दिवसेंदिवस वाढावं आणि याचे अनेक फायदे आपणास मिळावे.''

या नंतर वे.मू. सुशील पाटील यांनी पंडितप्रवर मधसूदन शर्मा यांना अर्पण करण्यात येणाऱ्या संस्कृत मानपत्राचे आणि त्याच्या मराठी अनुवादाचे वाचन केले.

''पण्डितप्रवर मधुसूदन शर्मा

आज या शुभप्रसंगी पण्डितप्रवर मधुसूदनशास्त्रींना सन्मानित करताना आम्हास अत्यानंद होत आहे. श्री. सुंदरराजन व मंजुलादेवी या




*वे.मू. सुशील पाटील मानपत्राचे वाचन करताना*

दंपतीचे ठिकाणी जन्म झालेले श्रीमान् मधुसूदनशास्त्रींनी कुमारवयातच ऋक्संहितेचे अध्ययन पूर्ण केले व शास्त्रविद्येच्या कुतूहलाने पुणे येथील महामहोपाध्याय पण्डितवरेण्य श्री. देवदत्त पाटीलशास्त्री यांच्याकडे शुद्धतर अशी तर्कशास्त्रविद्या संपादित केली. तसेच विद्वद्वरेण्य श्री द्वारकानाथाचार्य यांच्याकडे द्वैतवेदांतचे अध्ययन केलेत. विद्वत् सभांमध्ये आपल्या घनगंभीर शास्त्रनिरूपणाने इतर विद्वानांना आनंदित केलेत. आपण, शास्त्रअध्यापनाने आमचे परमगुरू श्रीसदुरू सहजानंदसरस्वती स्वामी महाराज यांचा वेदशास्त्रविद्येचे संवर्धन व्हावे हा मनोरथच सफल करीत आहात. त्यांच्याच प्रेरणेने सेवामण्डळ श्रीवासुदेवानन्तसरस्वती स्वामी समर्थ महाराजांच्या जयंती उत्सवाला अनुलक्षून आपणास अतिशय आनंदाने 'शास्त्रकलानिधी' ही पदवी व श्रीफल, महावस्त्र व रुपये एकावन्न हजार प्रदान करीत आहोत. भगवत्कृपेने आपणाला दीर्घायुरारोग्य व सच्छिष्य परम्परा प्राप्त होओ व आपला शारदीयकीर्तिचंद्र असाच नित्य शास्त्रनभोमंडलावर झळकत राहो अशी सद्गुरुचरणी प्रार्थना.

भवदीय,

अशोक रघुनाथ जोशी, विश्वस्त,

श्रीसदुरू वासुदेवानन्तसरस्वती सेवामंडळ

कार्तिक शु।।१५, शक १९४५; दि. २७ नोव्हेंबर २०२३



*पंडितप्रवर हरेराम त्रिपाठी जी पंडितप्रवर मधुसूदन शर्मा यांचा सत्कार करताना सोबत डावीकडे श्री. विकासराव वालावलकर,*

मानपत्राचे वाचन झाल्यावर मा. अध्यक्षांच्या हस्ते सत्कारमूर्तींचा पुष्पगुच्छ, विद्वद्वस्त्र, श्रीफळ, मानपत्र आणि महादक्षिणा रु. ५१,०००/- देऊन सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना मा. मधुसुदन शर्मा म्हणाले, ''पुण्यात मी २००३ साली आलो. मी देवदत्त पाटीलशास्त्री यांच्याकडे वेदाध्ययनाकरता आलो, तेव्हा मला भाषेची खूप समस्या होती. मला संस्कृतसुद्धा येत नव्हते. तेव्हा गुरुजी मला म्हणाले, ''तुला अजून संस्कृत व्यवस्थित येत नाहीये तेव्हा तू गावाकडे जा आणि संस्कृत शिकून ये.'' मी पुण्यात तीन ते चार महिने होतो. मी परत गावाला गेलो व संस्कृत शिकून घेऊन पुण्यात आलो व शास्त्राध्ययन केले. तेनाली, आंध्र प्रदेश येथे परीक्षासुद्धा दिल्या. पुढे वेदमूर्ती वसंत फडकेगुरुजी यांच्या नृसिंह सरस्वती पाठशाळेच्या शास्त्र विभागात श्री. पाटीलगुरुजी यांनी मला अध्यापन करावयास सांगितले त्या वेळी माझा लक्ष्मीरोड येथील राघवेंद्र मठात निवास होता. आता सध्या माझ्या गावामध्ये माझी वेद व शास्त्र यांची पाठशाळा आहे, तेथे मी अध्यापन करीत आहे. सध्या ४५ विद्यार्थी शिकत आहेत. तेथे शास्त्र, ऋग्वेद व यजुर्वेदाच्या शिक्षणाची सोय आहे. नुकत्याच आमच्या पाठशाळेतील एका विद्यार्थ्याचे न्यायशास्त्राचे अध्ययन पूर्ण झाले. सध्या तो व्याकरणशास्त्र शिकत आहे. विशेष उल्लेखनीय म्हणजे पाठशाळेत १५ विद्यार्थ्यांचे वेद व शास्त्र या दोहोंचे अध्ययन एकत्र सुरू आहे. हे सर्व कसे शक्य झाले? तर मला वाटते या शहरामुळे !

या शहराला पुणा, पुणे असे म्हणतात, परंतु संस्कृतमध्ये ह्याला 'पुण्यपत्तनम्' असे म्हणतात कारण ज्यांच्याकडे पुण्याचा साठा आहे त्यांनाच या शहरात वास्तव्य करण्याचा योग येतो. मला वाटते की माझ्या पूर्वपुण्याईने मी येथे या शहरात आलो. गुरुजींकडे येऊन अध्ययन केले, अध्यापन केले व सध्या माझ्या गावात मी माझ्या पाठशाळेत अनेक विद्यार्थी शिकवत आहे.''

दुसरे सत्कारमूर्ती वे.मू. मनोज माधव जोगळेकर यांचाही परिचय मानपत्र वाचनाद्वारे करून देण्यात आला.

''वेदमूर्ती - मनोज माधव जोगळेकर

जीवमात्रांच्या शुभाशुभ कर्मांचे संचयन असणाऱ्या अग्रसंधानीसंज्ञक




*पंडितप्रवर मधुसूदन शर्मा सत्काराला उत्तर देताना*



पंडितप्रवर हरेराम त्रिपाठी जी घनपाठी वे.मू. मनोज जोगळेकर यांचा सत्कार करताना




घनपाठी वे.मू. मनोज जोगळेकर सत्काराला उत्तर देताना

पुस्तिकेमध्ये परिगणित अशा अपूर्व पुण्याईने जोगळेकर कुलामधील ममता व माधव या दंपतीचे ठिकाणी जन्म प्राप्त करून लहान वयातच श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती यांनी स्थापन केलेल्या श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती पाठशाळेमध्ये परांजपेकुलोद्भव विद्वद्वरेण्य वेदमूर्ती श्री. माधवगुरुजींचे शिष्यत्व स्वीकारून ऋग्वेदाचे सदशग्रंथ घनांत अध्ययन करून अनेक वैदिक मंडळींमध्ये आपल्या विद्वत्तेचे प्रकटीकरण करणाऱ्या वेदमूर्ती श्रीमान् मनोजशर्मा यांना सन्मानित करताना आमचे अंत:करण हर्षोल्लासीत होत आहे. आपण स्वत:च्या निर्दोष अशा अस्खलित वाणीने कण्ठस्थ घनपारायण करून श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती स्वामीमहाराजांना संतुष्ट केले आहे. श्रीसद्गुरू सहजानन्दसरस्वती स्वामी समर्थ महाराज यांना आपणासारख्या विद्वानांबद्दल मोठी आस्था होती. त्यांच्याच प्रेरणेने सेवामण्डळ श्रीवासुदेवानन्तसरस्वती स्वामी समर्थ महाराजांच्या जयंती उत्सवाला अनुलक्षून आपणास अतिशय आनंदाने 'वेदकलानिधी' ही पदवी व श्रीफल, महावस्त्र व रुपये एकावन्न हजार प्रदान करीत आहे. वेदभगवत्कृपेने आपणाला दीर्घायुरारोग्य व सच्छिष्य परम्परा प्राप्त होओ व आपला शारदीय कीर्तिचंद्र असाच नित्य वैदिक नभोमंडलावर झळकत राहो, अशी सद्गुरुचरणी प्रार्थना,

भवदीय,

अशोक रघुनाथ जोशी, विश्वस्त,

श्रीसद्गुरू वासुदेवानन्तसरस्वती सेवामंडळ

कार्तिक शु।। १५, शके १९४५; दि.२७ नोव्हेंबर २०२३

मानपत्र वाचनानंतर शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र व महादक्षिणा रु. ५१,०००/- देऊन अध्यक्षांच्या हस्ते वे.मू. मनोज जोगळेकर यांचा सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती म्हणाले, ''मी प्रथम दि. २७ एप्रिल २००३ रोजी आपल्या समाधी मंदिरातील पाठशाळेत आलो. तेव्हा मंदारगुरुजींनी माझी चाचणी परीक्षा घेतली. त्या वेळी मी घरी असताना रामरक्षा व भीमरूपी स्तोत्र शिकलेलो होतो. त्यामुळे मंदारगुरुजींनी मला रामरक्षा व भीमरूपी स्तोत्र म्हणायला सांगितले. तेव्हा मी भीमरूपी स्तोत्र म्हणतांना चुकलो. नंतर चाचणी परीक्षा झाल्यानंतर आम्ही जेव्हा बाहेर आलो तेव्हा माझे वडील मला म्हणाले, 'अरे तू भीमरूपी स्तोत्र म्हणताना चुकलास. आता तुला ते पाठशाळेत घेतील की नाही ?' त्यावर मी काहीच बोललो नाही.

पण नंतर काही दिवसांनी परांजपेगुरुजींनी आम्हाला कळवले की तुम्हाला पाठशाळेत प्रवेश मिळाला आहे. तुम्ही १५ जूनला पाठशाळेत या. नंतर दि. १५ जून २००३ रोजी मी आपल्या सद्गुरू वासुदेवानंतसरस्वती पाठशाळेत अध्ययनासाठी आलो व १९ जून २००३पासून माझ्या अध्ययनाला सुरुवात झाली. तेव्हा गुरुजींनी प्रथम मला संथा शिकवण्यास सुरुवात केली. तेव्हा मला 'ओम्'सुद्धा व्यवस्थित म्हणता येत नव्हता. तरीही गुरुजींनी माझ्याकडून सर्व व्यवस्थित म्हणवून घेतले. नंतर एका वर्षानंतर म्हणजेच २००४ साली मला डेरवणच्या पाठशाळेत पाठवण्याचे ठरले. तेव्हा मला डेरवणला जाण्याची इच्छा नव्हती. कारण तोपर्यंत मला इकडची सवय झाली होती. पण काकामहाराजांच्या सांगण्यावरून मी डेरवणला गेलो. तेव्हा त्या वेळी तिथे शिकवायला साळस्करगुरुजी होते. गुरुजींनी माझ्याकडून संहिता, ब्राह्मण्य, अरण्यक उत्तम प्रकारे तयार करून घेतले. त्या वेळी गुरुजींचा आम्हाला खूप धाक होता. त्यांची शिस्तपण खूप कडक होती. आम्ही त्या वेळी त्यांना सर्व जण खूप घाबरत होतो. एके दिवशी गुरुजी आमचा अध्याय पाठ घेण्यासाठी आले. तेव्हा साधारण आम्ही नऊ विद्यार्थी होतो. आम्ही सर्वजण गुरुजींजवळ अध्यायपाठ घ्यायला बसलो. त्या वेळी गुरुजींचा नियम असा होता जर कोणी विद्यार्थी अध्यायपाठ देताना जर चुकला तर ते त्याला सरळ उठवून लावायचे. नंतर आमचा जसा जसा अध्याय संपत आला तसा तसा एकेक विद्यार्थी कमी व्हायला लागला. शेवटी मी, सिद्धांत जोशी आणि समीर मिराशी तिघे जणच



*वेदमूर्ती लक्ष्मण विनायक सप्रेगुरुजी पुरस्कार (संपूर्ण ऋग्वेद संहिता परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण) स्वीकारताना कु. बालसुंदर मुथुकृष्णन् (बंगळुरु)*



*वेदमूर्ती लक्ष्मण विनायक सप्रेगुरुजी पुरस्कार (याज्ञिक कर्मकांड परीक्षेत प्रथम क्रमांक) स्वीकारताना कु. प्रसाद कल्याण देशपांडे, नांदेड*

उरलो. अध्याय संपला तेव्हा गुरुजींनी आम्हाला सांगितले की जर तुम्ही अशीच तयारी ठेवली तर तुम्ही लवकर अध्ययन पूर्ण कराल. काकामहाराज जेव्हा जेव्हा डेरवणला येत असत त्या वेळी जेवायला बसल्यावर आम्हाला विचारायचे, 'अरे, तुझा कोणता अध्याय सुरू आहे? तू काय म्हणतो आहेस?' त्या वेळी आमचा जो अध्याय सुरू आहे तो आम्ही सांगायचो. नंतर पुढे काका परत डेरवणला आल्यावर आम्हाला जेव्हा अध्यायाचे विचारायचे त्या वेळी मागे सांगितलेला अध्याय जर परत सांगितला तर ते म्हणायचे, 'अरे मागच्या वेळी हाच अध्याय सांगितला होतास'. इतके काटेकोर लक्ष काकांचे आमच्यावर असायचे. साळस्कर गुरुजी जेव्हा बाहेरगावी कार्यक्रमास जात होते, तेव्हा गुरुजी नाहीत म्हणून आम्ही अभ्यासाकडे दुर्लक्ष करायचो. पण गुरुजी आल्यानंतर आम्हा सर्वांना विचारायचे की तुमच्या किती संथा झाल्या आणि जर कमी संथा झाल्या असल्या किंवा अध्याय पाठ नसला तर प्रतिपदेची सुट्टी मिळत नव्हती. एकदा साळस्करगुरुजी आम्हाला गावाला घेऊन गेले, तेव्हा त्यांनी मला स्वाहाकाराचा अध्याय म्हणायला सांगितला. मी अध्याय व्यवस्थित म्हंटला. तेव्हा वेदमूर्ती वसंत फडकेगुरुजींनी मला बोलवून घेतले. तेव्हा त्यांनी मला दहाची सहा नाणी बक्षीस म्हणून दिली. मी परत डेरवणला आल्यानंतर काकामहाराजांना मी जेव्हा हे सांगितले, तेव्हा श्रीकाका मला म्हणाले, तू असाच अभ्यास करत राहा. तू घनपाठी होशील. काकामहाराज ज्याज्या वेळी डेरवणला येत होते त्या वेळी ते आम्हाला समर्थ रामदास स्वामींचे एक वाक्य आवर्जून सांगायचे. ते म्हणायचे 'अभ्यासेन प्रगटावे!' नंतर ते आमच्या काळजीने आम्हाला सांगायचे जर तुम्ही अभ्यास केला तर यात माझे नाही, तुमचेच हित आहे. एकदा काकांनी मला सांगितले होते की तुझ्याकडे कपडे जर नसले तर सरळ मला सांगायचे मी तुला कपडे देतो. त्यांनी आमच्यावर खरं तर आई-वडिलांसारखी म्हणण्यापेक्षा त्याहून जास्त माया केली. त्यामुळे आम्हाला कोणत्याच गोष्टीची उणीव भासली नाही. दिवाळीला जरी घरी जाता येत नसले तरी घरच्यासारखी दिवाळी इथे साजरी होत होती. लक्ष्मीपूजन झाल्यानंतर फटाके उडवायचे. रोज फराळाचं असायचं. त्यामुळे आम्ही घरीच आहोत असे आम्हाला वाटत होते. नंतर २०११ साली मी पुण्यात



*कु. प्रभव मिराशी पाठांतर स्पर्धेचे पारितोषिक स्वीकारताना*



*कु. अनुज शहापुरे*



*कु. समर्थ नातू*



*कु. हर्षवर्धन मिराशी*



*कु. चिन्मय खाडिलकर*



*कु. स्पृहा काजरेकर*

पाठांतर स्पर्धा विजेते


कु. नीरजा गुप्ते


कु. श्रीपाद काळे


कु. अवंती माळवदकर


कु. स्वामिनी काळे


कु. वैदेही खेर

पदक्रम शिकण्यासाठी आलो. त्या वेळी परांजपेगुरुजींनी आमच्याकडून पद-क्रमांचा अभ्यास करून घेतला. त्यांनी आमच्याकडून उत्तम रितीने अभ्यास करून घेतला. गुरुजींबद्दल सांगायची सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या वेळी गुरुजी आजारी असायचे त्या वेळी ते आम्हाला सकाळी त्यांच्या घरी बोलवून घ्यायचे व आजारी असतानासुद्धा ते आमच्याकडून अभ्यास करून घेत होते. आपल्या समाधी मंदिरात होणाऱ्या विविध कार्यक्रमांमुळे मला खूप गोष्टी माहिती झाल्या. म्हणजे इथे होणारी व्रतं, पंचायतन याग, संहिता स्वाहाकार त्याचबरोबर त्यासाठी लागणारे साहित्य व तयारी तसेच या कार्यक्रमांमुळे होणाऱ्या विद्वान लोकांच्या भेटी, त्यांची ओळख हे सर्व समाधी मंदिरामुळे शक्य झाले. व २०१६साली झालेले २३ विद्वानांचे ऐतिहासिक मुखोद्गत घनपारायण प्रत्यक्ष बघायला मिळाले. तसेच त्या विद्वानांची सेवा करायला मिळाली. तेव्हा मला वाटले आपलेही असेच घनपारायण झाले पाहिजे व काकांनी प्रेरणा दिल्यामुळे ते झालेही. नंतर २०१८ साली मी व समीर मिराशी घनपाठाची तयारी करण्यासाठी डेरवणला गेलो व जेव्हा २०१९ साली आमची घनाची परीक्षा झाली, त्या वेळी काकांनी मला व मिराशीला सांगितले की तुमची घनाची परीक्षा झाली आहे. आता तुम्ही मुखोद्गत घनपारायण करा. नंतर तीन जुलै २०१९ ते १५ जुलै २०१९च्या गुरुपौर्णिमेच्या उत्सवामध्ये आमचे घनपारायण झाले. तेव्हा पारायण समाप्तीच्या दिवशी श्रीकाका आम्हाला म्हणाले की मी तुम्हाला राहण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केली आहे. आता तुम्ही घनाची तयारी करायला घ्या व मुखोद्गत घनपारायण करा. तेव्हा मला वाटले आता काही नको. नंतर २०२१ साली जेव्हा माझे लग्न झाले. त्या वेळी मी व माझी पत्नी काकांच्या दर्शनाला आलो होतो. तेव्हा काका मला म्हणाले की गुरुजी तुमचा अभ्यास सुरू आहे ना? त्या वेळी मी हो म्हणालो. नंतर घरी आल्यानंतर मला माझ्या पत्नीने विचारले की तुम्हाला महाराज एवढे सांगत आहेत तर तुम्ही घनाची तयारी का करीत नाही? तुम्हाला किती वेळ लागेल? त्या वेळी मी तिला सहज बोलून गेलो. मला दहा वर्षेतरी लागतील. नंतर काकांनी मिराशीला व सुशील पाटीलला परत आठवण करून दिली व सांगितले की तुम्हाला एक अष्टक घनाचे पारायण करायचे आहे. तेव्हा आम्ही तयारी करायला घेतली. नंतर आमचे एक अष्टक घनाचे पारायण झाले. या प्रकारे आमचे तीन अष्टके घनाचे पारायण झाले. तिसऱ्या पारायणाच्या काळात काकांनी सामूहिक घनपारायण करण्याचा निर्णय घेतला व घनपरायणाची तारीख ठरली. नंतर २२ नोव्हेंबर २०२१ ते १० जानेवारी २०२२ या काळात १४ जणांचे सामूहिक मुखोद्गत घनपारायण झाले. कारण काकांनी सांगितले होते जर पारायण करायचे असले तर ते मुखोद्गतच करायचे. नंतर काकांनी मला सांगितले. तू आता एकट्याने मुखोद्गत घनपारायण कर. पण ही गोष्ट माझ्यासाठी अवघड होती. त्यासाठी मला खूप प्रयत्न करावे लागणार होते. कारण एक तर तेव्हा माझे लग्न झालेले होते व घनाचे पारायण करायचे म्हंटले तर रोज अभ्यासाला बसायला लागणार होते. पण या काळातही माझ्या पत्नीने मला उत्तम रितीने साथ दिली. कारण तिच्यासाठी ही गोष्ट सोपी नव्हती. आपला नवरा काम करायचं सोडून आता अभ्यास करत बसलाय हे सहसा आता कुणाला पटले नसते. त्यामुळे मी आता तिचाही आभारी आहे व माझ्या घरच्यांकडून तसेच सासुरवाडीकडून मला चांगली साथ मिळाली. नंतर दि. २२ एप्रिल २०२३ रोजी माझी परत एकदा घनाची परीक्षा झाली. नंतर माझ्या घनपारायणाची तारीख ठरली. दि. २५ मे २०२३ ते १९ जुलै २३ व श्रवणकर्ते म्हणून वेदमूर्ती बोरकरगुरुजी असावेत असे मनोमन वाटत होते व ते पूर्णही झाले व दि. २५ मेला पारायणाला सुरुवात झाली. पारायण काळात मला माझे साथी सिद्धांत जोशी व मंदार क्षिरसागर यांनी उत्तम प्रकारे साथ दिली. कारण फक्त सकाळीच ते म्हणायचे असे नव्हते तर दुसऱ्या दिवशी सकाळी जे म्हणायचे आहे त्याची आवृत्ती दुपारी तयार करायला लागत होती. तसेच वेदमूर्ती योगेश्वर बोरकरगुरुजी यांनी मला उत्तम प्रकारे सांभाळून घेतले. व याच काळात घडलेली एक गोष्ट सांगतो. जेव्हा पारायण संपायला थोडे दिवस शिल्लक होते तेव्हा वेदमूर्ती योगेश्वर बोरकरगुरुजींना तिरुपती देवस्थानतर्फे कार्यक्रमाचे आमंत्रण आले होते आणि त्या कार्यक्रमाला त्यांना जाणे भागच होते. त्यामुळे पारायणात खंड

*पाठांतर स्पर्धा विजेते*


*कु. अवधूत नाईक*


*कु. ईशान मालवणकर*


*कु. इशिता मंत्री*


*कु. चैत्राली काळे*


*कु. श्रावणी काळे*


*कु. सोहा मिराशी*

पडणार होता. पण बाबांची लीला अगाध आहे. त्यामुळे तिरुपती देवस्थानचा कार्यक्रम त्यांच्याकडूनच रद्द करण्यात आला. त्यामुळे माझे पारायण सुरळीत पार पडले व माझा घन पारायणातला अनुभव सांगायचा म्हणजे मला जेव्हा काकांनी एकट्याने पारायण कर असे सांगितले त्यानंतर मी जेव्हा तयारी करायला घेतली, तेव्हापासून मला माझ्या घरात कशाचीच कमी पडली नाही. घराचा हप्ताही दर महिन्याला व्यवस्थित भरला जात होता. मग घरी कोणत्याच गोष्टीची कमी पडली नव्हती. ही सर्व सद्गुरूंचीच कृपा म्हटली पाहिजे. घनपारायणाच्या समाप्तीच्या दिवशी पाठशाळेतील सर्व आजी-माजी विद्यार्थ्यांनी मिळून मला सुवर्णकंकण दिले. तसेच समाधी मंदिरातील सर्व स्वयंसेवकांनी मिळून बाबामहाराजांची प्रतिमा असलेले सन्मान चिन्ह दिले. त्यामुळे मी या सर्वांचे आभार मानतो. खरंतर मला आज खूप भरून आले आहे. कारण समाधी मंदिरात शिकलेल्या विद्यार्थ्याचा सत्कार समाधी मंदिरातच विद्वत्-जनांमध्ये होत आहे ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे. कारण पूर्वी काही लोकांनी मंदिरावर टीका करायच्या वेळी असे म्हटले होते की समाधी मंदिरात एकही विद्यार्थी शाखेच्या पुढे अध्ययन करू शकत नाही. नुसती घनाची परीक्षा देऊन काही होत नाही तर घनपारायणही करायला लागते. असे काही लोकांनी हिणवले. पण सद्गुरूंच्या कृपेमुळे समाधी मंदिरातील विद्यार्थी घनापर्यंत अध्ययनही करत आहे व परीक्षा देऊन पारायणही करत आहे व आनंदाची गोष्ट म्हणजे आता आपल्या समाधी मंदिरात आज घनपाठी विद्यार्थी तयार आहे. ही सर्व महाराजांची व काकामहाराजांची कृपा. आज समाधी मंदिराने माझा जो सत्कार केला तो मी माझ्या गुरूंच्या चरणी अर्पण करतो. व समाधी मंदिरामुळे हे शक्य झाले. त्यामुळे मी आजन्म समाधी मंदिराचा ऋणी राहीन.''

त्यानंतर समारंभातील मुख्य कार्यक्रम म्हणजे वासुदेवानन्त सरस्वती सेवामंडळातर्फे ज्या वैदिक तथा अन्य पाठांतराच्या परीक्षा घेण्यात आल्या त्याचे निकाल व स्पृहणीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रक व पारितोषिक वितरण समारंभ सुरू झाला.

वैदिक पाठांतर स्पर्धेमध्ये, संपूर्ण ऋग्वेद संहिता परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याला देण्यात येणारा वेदमूर्ती लक्ष्मण विनायक सप्रेगुरुजी पुरस्कार कु. बालसुंदर मुथुकृष्णन् (बंगळुरु) यांना देण्यात आला. मानपत्र आणि रु. २५००/- असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. याज्ञिक कर्मकांड परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला श्री. विश्वनाथ मिराशी पुरस्कृत वेदमूर्ती लक्ष्मण विनायक सप्रेगुरुजी पुरस्कार देण्यात येतो. या वर्षी हा पुरस्कार कु. प्रसाद कल्याण देशपांडे, नांदेड यांना मिळाला. तसेच गुरुकुल पद्धतीने चालणाऱ्या वेद पाठशाळेला देण्यात येणारा पुरस्कार वे.मू. मुरवणेगुरुजी यांच्या वेदशाळेला देण्यात आला.

त्यानंतर अध्यक्षीय भाषण झाले. अध्यक्ष डॉ. हरेराम त्रिपाठी जी आपल्या भाषणाची सुरुवात संस्कृतमध्ये करून म्हणाले की मी माझे सौभाग्य समजतो की इथे, महाराष्ट्रातील या संस्थेमध्ये भारतीय संस्कृतीमध्ये अनादी समजल्या जाणाऱ्या वेदांची पारायणे होत आहेत. ऋग्वेद संहितेबरोबरच इतर वेदांची पारायणे, अनुष्ठाने कायम होत आहेत. आपल्या भारतीय ज्ञानपरंपरेचे जतन संरक्षणसुद्धा केले जाते. गेली ७०० वर्षे आपल्या ज्ञानपरंपरेवर, वेदांवर, संस्कृत भाषेवर आणि संस्कृतीवर यवनांकडून, स्वकीयांकडून आणि अगदी परवापर्यंत इंग्रजांकडून अनेक आघात झाले, तरीसुद्धा आपल्यासारख्या विद्वानांनी अत्यंत कष्टपूर्वक या ज्ञानपरंपरेचे संरक्षण केले व करत आहात त्यामुळेच आपली संस्कृती, संस्कृत भाषा, वेद वाङ्मय टिकून आहे.

पुढे हिंदीमध्ये आपले विचार मांडताना ते म्हणाले, . ''यह मेरा सौभाग्य है कि जैसे यहां का आचार और व्यवहार हमने जो देखा उससे बहुत अच्छा लगा। गुरुदेव दत्त स्वामी जी से लेकर जो कि परमात्म स्वरूप थे और श्री नृसिंह सरस्वती महाराज जी, श्री स्वामी समर्थ महाराज जी, श्री सद्गुरू रामानंद बीडकर महाराज जी,




पंडितप्रवर हरेराम त्रिपाठी जी आपले विचार व्यक्त करताना

श्री सदुरु बाबा महाराज जी, श्री सदुरू सहजानंद सरस्वती महाराज जी, श्री सद्गुरु काकामहाराज जी ऐसी परंपरा जो गुरू परंपरा जो यहां पर प्रवाहित हो रही है ।

वेद को 'श्रुती' शब्द से कहा जाता है। किसलिये कहा जाता है? गुरु के मुख के उच्चारण के अंतर जो सुना जाता है उसे हम श्रुती कहते हैं। और एक ऐसी परंपरा जो कि आचार व्यवहार सभी में उस परंपरा की जो अनादिकाल से हैं, उसका संरक्षण यवनों के आक्रमण के बाद भी, ब्रिटिश साम्राज्य ने हमारी संस्कृति को इस धरोहर को नष्ट करने के लिये सतत प्रयास किया; तथापि पुनर्जीवित है। आप लोगों ने इसे पुनर्जीवित किया । ऐसी गुरू परंपरा में जो भारत में महाराष्ट्र में जो परम्पराएं थी उसको पुनर्जीवित किया। आप सभी ने शिवाजी जैसे वीर पुरुष एक छोटेसे साम्राज्य को करते करते इतना बडा साम्राज्य उन्होंने स्थापित किया। इतनी बडी सेना आपके बल से पराजित किया। 'शिवराज विजय' में आया है कि अफझल खान यह सोच रहा था कि हम शिवाजी को पकड लेंगे। धोखे से पकड लेंगे और उन्हें अपना बंदी बना लेंगे। और साम दाम दंड भेद में योग्य वीर शिवाजी, जब शिवराज विजय में आया है-

रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातम् ।
भास्वानुदेष्यति हसिष्यति पंकजश्रीः।
इति विचारयति कोषगते द्विरेफे
हा हंत हंत नलिनीं गज उज्जहार।।

''इसका तात्पर्य यही है कि भ्रमर ने कमल के फूल में उसके प्रेमरस, उसका पराग जो लिया था। सूर्यास्त हुआ, उसी में बंद हो गया। वह सोचा कि इस कोमल पराग को, जिसे मैं ले रहा हू उसको छेद करके मैं कैसे निकलूंगा? नहीं, नहीं ऐसा नहीं कर सकता हू । रात्रि जायेगी। सबेरा होगा। सूर्योदय होगा। सूर्य की रोशनी होगी तो हम निकल कर चले जायेंगे। इसको हम छेद नहीं सकते। इसको बहुत बडा प्रेम करते हैं। तब तक वह घोर में रह जाता है। और सुबह होते ही हाथी उस लाल पुष्प को मुंह में लेकर के खा लेता है और भ्रमर नष्ट हो जाता है। ठीक उसी तरह से अफजल खान जब सोच रहा था; तो वीर शिवाजीने वैसे ही अपने बाघनखे से उसको चीर डाला।

शिवराज विजय में आया है, कि एक पर्णकुटी होती थी। और उसमें सवेरे उठ करके अपने गुरुजी को संध्यावंदन के लिए बुलाते थे। स्वयं संध्या वंदन करते रहे। यदि कोई यवन या दुश्मन आता था, उसमें से तलवार पर्णकुटी से निकालते थे और उसका संहार करते थे। इसी तरह वीर शिवाजी की यह जो सेना है। जो कि आज इतिहास में कायम है। हिंदू साम्राज्य की भारतीय सनातन परंपरा की रक्षा करना भी महाराष्ट्र में हुई। और इस तरह के लोगों के द्वारा हुई। जैसा कि चना जो एक बीज होता है। एकही बीज बचा है। तो धीरे धीरे वह जो स्फूल्लित होता है। तो असंख्य बीजों को पैदा करता है। ऐसे वेदमूर्तीयों ने उस सनातन परंपरा को सातसो साल, पांचसो साल यवनों के द्वारा, दोसौ साल ब्रिटिश साम्राज्यों के द्वारा, यवनों के द्वारा हमारी संस्कृति को नष्ट करना चाहे। नालंदा विश्व विद्यालय जो छः महीने जला। हमारे संस्कार को, हमारे संहिता को ऐसे वेदमूर्तियों ने उसको कंठस्थ करके इसको पुनर्जीवित रखा। फिर धीरे धीरे करके पूरे भारतवर्ष में क्या, पूरे विश्व में प्रसारित कर दिया। आगे भी हम अध्ययन करें। वह कहते कि विश्व का सबसे प्राचीन जो साहित्य ऋग्वेद है। ऋग्वेद में भी द्वितीय मंडल से लेकर आठवे मंडल को मॅक्समुलर ने जब एक हजार ईसा पूर्व स्वीकार किया लेकिन उसने कहा की ऐसी कोई शक्ति नही है जो प्रयोग के द्वारा सिद्ध कर सके ईसा पूर्व एक हजार ऋग्वेद के द्वितीय मंडल से आठवे मंडल तक की इसकी रचना हुई। इसका मतलब यह है कि वह हमारी संस्कृति को दबाने के लिए, उस साहित्य को दबाने के लिए, एक हजार वर्ष पूर्व का अनुमान लगाते है । ये जो दस, बीस, पचास हजार वर्ष पूर्व ऋग्वेद परंपरा थी इसको आप जैसे गुरुओं ने उसको संरक्षित किया। बडा सौभाग्य हमारा है कि काकाजी महाराज जैसे एक गुरुदेव दत्त स्वामीजी के द्वारा प्रवर्तित योग आया है।

मनुस्मृति में ''एतत् देश प्रसूतस्य सकाशादग्र जन्मनः। स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः।।'' इस देश में उत्पन्न, यहां के जो मानव है अपने चरित्र से, ज्ञान तो अलग है, अपने चरित्र से, अपने व्यवहार से पूरे विश्व को शिक्षा देते रहे हैं। तो जैसे हमारे काका महाराज जी जैसे गुरुदेव दत्त स्वामीजी से लेकर के यह जो परंपरा है। कैसे उसको प्रोत्साहित करने के लिए कैसे छोटे छोटे

बालकों के लिए और हमारे लिए पूज्य है, नमस्कार योग्य है। क्या उसकी प्रतिभा को निखारने के लिए हमारी संस्कृति की रक्षा के लिए, वेद, पुराण के रक्षा के लिये काकाजी महाराजजी ने गुरुदेव दत्त परमपूज्य स्वामीजी से लेकर काकाजी महाराजजी एक परंपरा हैं। आज हमने भोजन के समय देखा। ऐसी परंपरा, ऐसा व्यवहार जो अनादिकालसे कैसे उसकी रक्षा कर रहे हैं। आज पूरा विश्व स्वीकार कर किया है कि पंचगव्य जो है सभी बीमारियों का अंत कर सकता है। उस गोबर से लिपे हुए में कोई दूषक तत्त्व आ ही नहीं सकते हैं। कोविड-१९ को पराजित करना है। भारतीय परंपरा जो है गोबर से लीपना, तुलसी से चाय पानी करना, जो जो हमको आयुर्वेद से औषधियां स्वतः प्राप्त होती थी। जिसकी प्रतिरोधक क्षमता होती थी जिसे हमारे गुरुदेव दत्त स्वामीजी से लेकर काकाजी महाराज कैसे उसकी रक्षा कर रहे हैं। उसमें आप सहभागी बन रहे हैं। अभी हमारे आचार्य प्रवर ने बताया। पुण्य पत्तनम् है। वास्तव में मैं मान गया हूं। जहां पर पुण्य ही पुण्य है। जिस महाराष्ट्र में जहां पर अभी सुने तो बडा आश्चर्य लगा। कि जहां पर दस पाठशालायें हैं। किसी में बीस, किसी में तीस, किसी में चालीस इस तरह शुद्ध भारतीय संस्कृति के रक्षा करने वाले युवा विद्वान तयार हो रहे हैं। जो कि आगे चल करके देखिये राष्ट्रीय शिक्षा नीति २०२० में बताया गया है। भारतीय ज्ञान परंपरा को बचाइये। इसकी रक्षा करिये जो हमारे कुल की नीति हैं उसकी रक्षा करिये। इस तरह की शिक्षा जो बन रही है उसमें आप सबका बहुत बडा योगदान हो सकता है। और जो हम देख रहे हैं की काकाजी महाराज जी की एक परंपरा हैं जिसको आप सभी ने सहयोग करके, समर्थन करके उसको बचाये रखा है। यह महाराष्ट्र की परंपरा, हो सकता है कि आगे चलनेवाली २०३० में भारतीय ज्ञान परंपरा को विश्व अपनायेगा। २०४० तक पूरा विश्व इसका अनुकरण करेगा। काकाजी महाराजजी की यह परंपरा है उसको प्रणाम करेगा। बहुत सौभाग्य है अभी हमारे जो आचार्यप्रवर जी ने कुछ ग्रंथ दिये थे। महाराज जी का पूरा जीवन चरित्र देख रहे थे। आज ही हमको देखने को मिला। जिसने अपना जीवन समाज के लिए जिया, समाज को कैसे परिवर्तित किया। समाज की रक्षा कैसी की जाये। समाज को नयी दिशा कैसे दी जाये। हम अपने संस्कार को भूल गये विशेष करके जो चिकित्सक है, जो इंजीनियरिंग के जो छात्र है पाश्चात्य संस्कार के कारण हम उस परंपरा को खोते जा रहे हैं। अब समय आ गया है की सबसे पहले संस्कार का आदान, इस की रक्षा करना हमारा परम कर्तव्य है। तो इसके लिये मैं बहुत नतमस्तक हूं। और ऐसा दिव्य पुरुष इसके जन इसके पीछे चल रहे है। जिसका ऐसा व्यवहार जो सामान्य जैसा है। दिव्य पुरुष ऐसेही होते हैं। दिव्य पुरुष इनकी दिव्यता जो होती है वह समाज के कल्याण के लिए होती है। मैं धन्य हूं। इस पुणे मे जहां सिर्फ पुण्य ही पुण्य है यहां तो कोई आया तो पुण्य लेकर ही जायेगा।

''बड़ें भाग मानुष तनु पावा। सुर दुर्लभ सब ग्रंथन्हि गावा।।''

देवता लोक जब स्वर्ग में जाते हैं। जैसी आपकी अभिलाषा होती है। उसकी पुष्टि हो जाती है। दुःख है ही नहीं। सुख स्वरूप है। जिनका पुण्य क्षीण होता है। तो देवता को भी लगे कि मैं मनुष्य बनूं। क्योंकि मनुष्य इसकी शक्ति हैं। जो कि मोक्ष को प्राप्त कर सकता है। काम और क्रोध ये जो अनित्य हैं। मोक्ष को प्राप्त करने वाला कौन है? वह मनुष्य ही है। काकाजी जसे गुरुदेव दत्त स्वामीजी से लेकर काकाजी महाराज जो पुण्यात्मा है। जो मोक्ष को प्रदान करने के लिए समर्थ है। उनका आचार, व्यवहार, रीति रिवाज जिसको आप अपना रहे हैं। जिस लोक में हमारी उन्नति होगी उसको हम धर्म कहते हैं। साक्षात धर्म का यहां अस्तित्व है। ऐसी जो पाठशालाएं हैं जिस तरह उसकी रक्षा करने के लिए ऐसे ऐसे युवक को तयार कर रहे हैं। धन्य हैं महाराज। मैं सबको नमन करता हूं।

सबको नमन करते हुए, विशेष करके जो हमारे काका जी महाराज ने इस तरह से दिव्य आयोजन किया। सहजानंद गुरू महाराज और अन्य जो हमारे ईश्वरस्वरुप स्वामी गुरू स्मृति में, जयंती में इस तरह के जो उत्सव कर रहे हैं। इससे हमें प्रेरणा लेनी है। दिव्य पुरुषों के बताये गये जो संकल्प है और उनके द्वारा जो मार्ग है उस मार्ग को हम अपनाकर चलते है। जीवन का सबसे बडा लक्ष्य है मोक्ष को प्राप्त करना। और उसमें हम सब, आप के सहयोग से, महाराज के सहयोग से, हम भी उसके पात्र भविष्य में बन सकते हैं।

''सठ सुधरहिं सतसंगति पाई । पारस परस कुधात सुहाई ।।''

दुष्ट भी सज्जनों की संगति से, ऐसे स्वामियों की संगति से उनमें परिवर्तन होता है। और इस पारस पत्थर के स्पर्श से यह देह भी सोना बन जाता है। और हम भी उस मार्ग का गमन करे। अनुसरण करे। और वही पूरे विश्व को एक नयी शिक्षा दे। इन शब्दों के साथ, विविध शास्त्रोंके निष्णात, संहिता के परायण कर्ता, वेदमूर्तीयों को नमन करते हुए, जिन्होंने स्मृति की संरक्षण रक्षा करते हुए उसका विस्तार करते जा रहे हैं, और उसका संरक्षण करने वाले काकाजी महाराज और उनके बगल में बैठे हुए, नाम तो मुझे नहीं याद है। बडा आश्चर्य है कि जो आप भी स्वयं घनपाठी हैं। आपके सुपुत्र भी इस तरह के विद्वान है, ये जो कुल की परंपरा है। ऐसा है, जो .. सूत्र में आया है, जिस कुल में व कुल रीति की जो चर्चा करते है वही धर्म है। 'आचारः परमो धर्मः।' और उनके कुल की यह जो परंपरा चल रही है शास्त्र संरक्षण, संहिताओं का संरक्षण जो चल रहा है जो कि भविष्य में इन्हीं के कारण हम अवश्य ही विश्व के गुरु बनेंगे। और २०४० तक विश्वगुरू बनेंगे। साथ ये जो आत्माएं यहां जो उपस्थित है यही जो बताएं कि आपके संसर्ग से हम भी दिव्य हो गए। आप भी दिव्य हो गये। दिव्य आत्माएं, सबको नमन करते

हुए मैं वाणी को विराम देता हूं। जयतु श्री विठ्ठलराव जोशी चॅरीटीज ट्रस्ट, जयतु श्री वासुदेवानंत सरस्वती वेदपाठ शाळा। जय श्री गुरुदेव दत्त परंपरा । ''

वे.मू. निगुडकर यांनी आभारप्रदर्शन केल्यानंतर वरयाचना पठणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

सायंकाळी त्रिपूर पूजन आणि तुलसी विवाह साग्रसंगीतपणे अत्यंत उत्साहात साजरा झाला.

**सोमवार, दि.२७ नोव्हेंबर २०२३; कार्तिक पौर्णिमा, शक १९४५**
**श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे जयंती दिन**

श्रीबाबामहाराजांचा जयंती उत्सव श्रीमहाराजांनी प्रस्थापित केलेल्या परंपरेप्रमाणे अत्यंत भक्तिभावाने साजरा झाला. सकाळी भक्तगणांचे सामुदायिक नामस्मरण, सामुदायिक उपासना, उपनिषदपठण, लघुरुद्राभिषेक, आचार्य पद्मनाभ व्यास यांचे प्रवचन आदी कार्यक्रमानंतर श्रीबाबांच्या मंदिरात ह.भ.प. पद्मनाभ व्यास यांनी जन्मोत्सवाचे कीर्तन केले. जन्मोत्सवाचा सोहळा अत्यंत भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. त्यानंतर महाप्रसाद झाला. सायंकाळी 'श्रीं'ची रथातून समाधिमंदिरात पालखीप्रदक्षिणा काढण्यात आली. भक्तगणांनी अत्यंत उत्साहाने नाचत, भजन करीत या सोहळ्यात भाग घेतला.

**मंगळवार, दि. २८ नोव्हेंबर २०२३; कार्तिक वद्य १, शक १९४५**
सकाळी भक्तगणांचे सामुदायिक नामस्मरण, सामुदायिक उपासना, उपनिषदपठण, लघुरुद्राभिषेक, आचार्य पद्मनाभ व्यास यांचे प्रवचन आदी कार्यक्रमानंतर, सायंकाळी डॉ. आशिष लेले यांचा सत्कारसोहळा झाला. त्यानंतर रात्रौ १०.०० ते २.०० या काळात लळीताचे कीर्तन होऊन प्रसादवाटपानंतर श्रीबाबांचा धावा पठण करण्यात येऊन उत्सवाची सांगता झाली.


न्हाणें घालीती प्रभूसी शुद्ध जळीं ।


जो जो जो जो रे रामचंद्रा / गुरुदत्त अवतारा ।।


चरणस्पर्श होता त्याचा । पाश तुटे मायेचा ।।


तुलसीविवाह


द्यावा प्रसाद ताटीचा ।

**मालक, मुद्रक, प्रकाशक** : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिर, ९३७ डी, ज्ञानेश्वर पादुका चौकाजवळ, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६ येथून प्रकाशित केले.
**संपादक** : श्री. विनायक चिंतामण पराडकर, अध्यक्ष, श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती सेवामंडळ. दूरभाष क्र.: ०२०-२५६५५०२१